MET Bhujbal Knowledge City

Institute of Engineering

एम.इ.टी./बी.के.सी./आय.ओ.ई./जा.क्र./ दि.१९/११/२०२५

प्रती,
विभागीय अधिकारी, ,
समाज कल्याण विभाग,
नाशिक.

विषय : मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी, "नशामुक्त भारत" अभियान ह्या उपक्रमाचा अहवाल सादर करणे बाबत.

संदर्भ : मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय यांचेकडून आलेल्या सुचनेनुसार

महोदय,

वरील संदर्भीय पत्रानुसार प्रत्येक महाविद्यालयात मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी नशा मुक्त भारत अभियान (NMBA) हे प्रतिबंध, उपचार आणि पुनर्वसन याद्वारे मादक द्रव्यांच्या दुरुपयोगाला संबोधित करणारी एक देशव्यापी मोहीम आहे. याअनुषंगाने नशामुक्त भारताच्या दिशेने राष्ट्रीय चळवळ सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने 15 ऑगस्ट 2020 रोजी सुरू केलेले, अभियान अंतर्गत उपक्रम साजरा करण्याच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत तरी वरील सुचनेनुसार आपण शनिवार, दिनांक मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२५, महाविद्यालयात "नशामुक्त भारत अभियान", ह्या उपक्रमांतर्गत मुंबई एज्युकेशनल ट्रस्ट चे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नशिक. या महाविद्यालयामार्फत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्याचा अहवाल आपणास सविनयसादर करीत आहोत.

कळावे,

डॉ. विजयकुमार वाणी
प्राचार्य

Adgaon, Nashik - 422 003
Mobile : (91) 09881100099 | Tel. : (0253) 2303515 | Telefax : (0253) 2303203
E-mail : enquiries@bkc.met.edu | www.metbhujbalknowledgecity.ac.in
ISO 9001-2008 certified MET is an NGO in Special Consultative Status with United Nations (ECOSOC)

MET Bhujbal Knowledge City
Institute of Engineering

एम.इ.टी./बी.के.सी./आय.ओ.ई./जा.क्र./ दि.१९/११/२०२५

प्रती,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
सामनगाव रोड, नाशिकरोड,
नाशिक.

विषय : मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी, "नशामुक्त भारत" अभियान ह्या उपक्रमाचा अहवाल सादर करणे बाबत.

संदर्भ : मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय यांचेकडून आलेल्या सुचनेनुसार

महोदय,

वरील संदर्भीय पत्रानुसार प्रत्येक महाविद्यालयात मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी नशा मुक्त भारत अभियान (NMBA) हे प्रतिबंध, उपचार आणि पुनर्वसन याद्वारे मादक द्रव्यांच्या दुरुपयोगाला संबोधित करणारी एक देशव्यापी मोहीम आहे. याअनुषंगाने नशामुक्त भारताच्या दिशेने राष्ट्रीय चळवळ सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने 15 ऑगस्ट 2020 रोजी सुरू केलेले, अभियान अंतर्गत उपक्रम साजरा करण्याच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत तरी वरील सुचनेनुसार आपण शनिवार, दिनांक मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२५, महाविद्यालयात "नशामुक्त भारत अभियान", ह्या उपक्रमांतर्गत मुंबई एज्युकेशनल ट्रस्ट चे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नशिक. या महाविद्यालयामार्फत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्याचा अहवाल आपणास सविनयसादर करीत आहोत.

कळावे,

डॉ. विजयकुमार वाणी
प्राचार्य

Adgaon, Nashik - 422 003
Mobile : (91) 09881100099 | Tel. : (0253) 2303515 | Telefax : (0253) 2303203
E-mail : enquiries@bkc.met.edu | www.metbhujbalknowledgecity.ac.in
ISO 9001-2008 certified MET is an NGO in Special Consultative Status with United Nations (ECOSOC)

# INTERNAL NOTE

| |
|---|
| Ref. No:- BKC/MET/IOE/Library/2025-26 |
| From:- Dr. Sambhaji Patil (Librarian) |
| To: - All Heads, MET-BKC-IOE, Nashik |
| Through: - Principal, MET-BKC-IOE, Nashik |
| Sub.: - मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी, "नशामुक्त भारत" अभियान अंतर्गत शपत घेणे बाबत ....... |
| Date:- १७ नोव्हेंबर २०२५ |

"नोटीस"

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि, महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी यांना निमंत्रित करण्यात येते कि, मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय यांचेकडून आलेल्या सुचनेनुसार नशामुक्त भारताच्या दिशेने राष्ट्रीय चळवळ सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने 15 ऑगस्ट 2020 रोजी सुरू केलेले, नशा मुक्त भारत अभियान (NMBA) हे प्रतिबंध, उपचार आणि पुनर्वसन याद्वारे मादक द्रव्यांच्या दुरुपयोगाला संबोधित करणारी एक देशव्यापी मोहीम आहे. नशामुक्त भारत मोहीम ही तीन टप्प्यांवर होणारी मोहीम आहे ज्यामध्ये नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोचा पुरवठा रोखणे, पोहोच आणि जागरूकता आणि सामाजिक न्याय आणि सक्षमीकरणाचा मागणी कमी करण्याचा प्रयत्न आणि आरोग्य विभागामार्फत उपचार यांचा समावेश आहे..

नशा मुक्त भारत अभियान हा सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाचा एक प्रमुख कार्यक्रम आहे. ज्याचा उद्देश उच्च शिक्षणावर विशेष लक्ष केंद्रित करून तरुणांमध्ये अमली पदार्थांच्या दुरुपयोगाच्या दुष्परिणामांबद्दल जागरूकता निर्माण करणे आहे. यानिमित्ताने मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ प्रत्येक महाविद्यालयात "नशामुक्त भारत" जनजागृती अभियान अंतर्गत शपत घेणे तसेच विविध उपक्रम राबविण्याच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत तरी वरील सुचनेनुसार आपण मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रत्येक वर्गामध्ये विद्यार्थाना शपत घेण्याचा तसेच नशामुक्त भारत जनजागृती हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. तसेच आपल्या महाविदयालयातील सर्व विदयार्थ्यांना नशामुक्त भारत अभियानाची ऑनलाईन शपथ घ्यावयाची आहे. त्यासाठीची लिंक सोबत पाठविण्यात येत आहे. ह्या लिंक द्वारे प्रत्येक विद्यार्थ्याने लिंक मध्ये माहिती भरून प्रमाणपत्र काढून घ्यावे. लिंक: https://nmba.dosje.gov.in/pledge-certificate?type=e-pledge

त्यानिमित्ताने आपण सर्वांनी ह्या कार्यक्रमास उपस्थित रहावे. सर्व प्रमुख, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यामध्ये आपला सहभाग नोंदवावा, तुमची उपस्थिती हीच कार्यक्रमाची यशस्वीता आणि शोभा आहे.

मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२५, मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३. वेळ: सकाळी ११.०० वाजता

| डॉ. संभाजी पाटील | प्रा. योगेश पाटणी | डॉ. विजयकुमार वाणी |
|---|---|---|
| ग्रंथपाल | राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी | प्राचार्य |

प्रत : सर्व विभाग प्रमुख

दिनांक १९ नोव्हेंबर २०२५

# "नशामुक्त भारत" जनजागृती अभियानावर आधारित अहवाल

**मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक – ३**
**दिनांक : मंगळवार, १८ नोव्हेंबर २०२५ ,** **वेळ : सकाळी ११.०० वाजता**

आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात भारत देश प्रगतीकडे वाटचाल करत असताना युवक हे राष्ट्राच्या भविष्यातील प्रमुख नेतृत्व आहेत. शिक्षित, सजग आणि निरोगी तरुणाईच देशाला योग्य दिशा देऊ शकते. परंतु, युवकांमध्ये वाढत चाललेले व्यसनाधीनतेचे प्रमाण ही राष्ट्रासाठी चिंतेची बाब बनत आहे. समाजातील वाढत्या नशेच्या प्रवृत्तीमुळे केवळ वैयक्तिक आयुष्यच नाही तर सामाजिक, आर्थिक आणि राष्ट्रीय स्तरावरही गंभीर परिणाम होत आहेत.

या पार्श्वभूमीवर भारत सरकारने आणि महाराष्ट्र शासनाने नशामुक्त भारताची चळवळ देशभर प्रभावीपणे राबविण्यासाठी विशेष उपक्रम आखले आहेत. त्याच अनुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिलेल्या निर्देशानुसार तसेच मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या आवाहनाचा मान राखून देशभरातील सर्व महाविद्यालयांमध्ये **"नशामुक्त भारत" जनजागृती व शपथ उपक्रम** आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

त्या अंतर्गत मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३ येथे दिनांक **१८ नोव्हेंबर २०२५** रोजी सकाळी **११.०० वाजता** विद्यार्थ्यांसाठी आणि प्राध्यापकांसाठी नशामुक्त भारत अभियानासंबंधी विशेष जनजागृती कार्यक्रम तसेच शपथग्रहण सोहळा उत्साहात संपन्न झाला.

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने **१५ ऑगस्ट २०२०** रोजी सुरू केलेल्या **नशा मुक्त भारत अभियान (NMBA)** चा मुख्य उद्देश म्हणजे देशातील विविध स्तरांवरील व्यसनाधीनता कमी करणे, मादक पदार्थांच्या दुरुपयोगातून मुक्त समाज निर्माण करणे आणि जनतेमध्ये जागरूकता निर्माण करणे हा आहे.
ही राष्ट्रीय पातळीवरील चळवळ तीन प्रमुख घटकांवर आधारित आहे:

1. **नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोमार्फत पुरवठा रोखणे**
   – मादक द्रव्यांचा पुरवठा थांबवणे, पुरवठा साखळीवर नियंत्रण ठेवणे आणि अवैध व्यापार रोखणे.
2. **पोहोच आणि जनजागृती कार्यक्रम**
   – समाजात, विशेषतः विद्यार्थ्यांमध्ये आणि तरुणांमध्ये व्यसनाच्या दुष्परिणामांविषयी योग्य माहिती पोहोचवणे.
3. **आवश्यक उपचार आणि पुनर्वसन सुविधा पुरवणे**
   – आरोग्य विभागामार्फत उपचार, समुपदेशन आणि पुनर्वसन सेवा उपलब्ध करून देणे.

सध्या हा अभियान देशातील **३७२ जिल्ह्यांमध्ये** राबविण्यात येत आहे. विशेषतः **उच्च शिक्षण संस्थांमधील युवकांना** व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व पटवून देणे हे या अभियानाचे मुख्य लक्ष केंद्रित आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या सुचनांनुसार दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात नशामुक्त भारत अभियानांतर्गत खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**1. शपथग्रहण सोहळा:** प्रत्येक वर्गात प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांनी नशामुक्त भारताची शपथ घेतली. विद्यार्थ्यांनी स्वतः नशामुक्त राहण्याचे, इतरांमध्ये जनजागृती करण्याचे आणि समाजहितासाठी आपला सक्रिय सहभाग नोंदविण्याचे वचन दिले.

**2. जनजागृती व्याख्यान:** राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने प्रा. योगेश पाटणी यांनी विद्यार्थ्यांना नशेचे सामाजिक, मानसिक आणि शारीरिक दुष्परिणाम समजावून सांगितले. त्यांनी चालू पिढीत वाढत चाललेल्या व्यसन प्रवृत्तीवर गंभीर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःचे आरोग्य, वेळ, कुटुंब आणि करिअर यांचे महत्त्व अधोरेखित करून नशेपासून दूर राहण्याचे आवाहन केले.

**3. प्राचार्यांचे मार्गदर्शन:** महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. विजयकुमार वाणी यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हटले की, "नशा ही फक्त एखाद्या व्यक्तीची समस्या नसून ती संपूर्ण समाजाला अपंग करणारी प्रक्रिया आहे. युवक राष्ट्राची अमूल्य संपत्ती आहेत. त्यांचे आरोग्य, शिक्षण आणि चारित्र्य हे भारताचे मजबूत भवितव्य घडवतील." त्यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून नशामुक्त भारत अभियानात सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले.

**कार्यक्रमाची सविस्तर माहिती:** कार्यक्रम सकाळी ११.०० वाजता सभागृहात सुरू झाला. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यानंतर नशामुक्त भारत अभियानाची संकल्पना, उद्दिष्टे आणि महत्त्व यावर माहिती यावर माहिती सांगण्यात आली.

**शपथग्रहणाचा क्षण:** सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, विभागप्रमुख आणि कर्मचारी वर्ग यांनी राष्ट्रहितासाठी एकसंघ येत खालीलप्रमाणे शपथ घेतली:

**व्यसनाचे दुष्परिणाम :** विद्यार्थ्यांना दिलेले मार्गदर्शन: ग्रंथपाल डॉ. संभाजी पाटील यांनी आपल्या व्याख्यानात विद्यार्थ्यांना सांगितले की व्यसनामुळे आरोग्याला अपाय होतो, अभ्यासावर विपरीत परिणाम होतो, कौटुंबिक संबंध बिघडतात, मानसिक तणाव, नैराश्य आणि हिंसक प्रवृत्ती वाढते आणि तरुणांचे करिअर संपुष्टात येण्याचा धोका वाढतो. त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आयुष्याचे ध्येय स्पष्ट ठेवण्याचा, आरोग्यदायी सवयी लावण्याचा आणि चुकीच्या सवयी किंवा दबावापासून दूर राहण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या अनुभवांची देवाणघेवाण केली. काही विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त भारतासाठी जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम महाविद्यालयात नियमितपणे आयोजित करण्याची मागणीही मांडली. नशामुक्त भारत अभियानाचे उद्दिष्ट केवळ व्यक्तीला व्यसनमुक्त करणे नाही, तर **व्यसनमुक्त समाज आणि व्यसनमुक्त राष्ट्र** घडविणे आहे. युवकांना योग्य दिशा देणे हे शैक्षणिक संस्थांचे कर्तव्य असून हा कार्यक्रम त्या सामाजिक जबाबदारीचा एक महत्त्वाचा टप्पा होता.

मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित केलेला नशामुक्त भारत जनजागृती व शपथग्रहण कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. समाजाला व्यसनमुक्त करण्याची ही लढाई दीर्घकालीन असली तरी अशा उपक्रमांद्वारे समाजातील जागृतीचा पाया मजबूत होत आहे. युवकांचे संरक्षण आणि राष्ट्राच्या सबलीकरणासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तसेच महाविदयालयातील सर्व शिक्षक कर्मचारी आणि विदयार्थ्यांनी नशामुक्त भारत अभियानाची ऑनलाईन शपथ घेतली आहे . त्यासाठीची लिंक सर्व विद्यार्थ्यांना पाठविण्यात आली होती. सदर लिंक द्वारे प्रत्येक शिक्षक कर्मचारी आणि विद्यार्थ्याने लिंक मध्ये माहिती भरून प्रमाणपत्र काढून घेतले. लिंक: https://nmba.dosje.gov.in/pledge-certificate?type=e-pledge

## शपथ/Oath

### (शपथ हिंदी में)

प्रिय साथियों,

युवा किसी भी राष्ट्र की शक्ति होते हैं जिनका समाज एवं देश के विकास में महत्वपूर्ण योगदान होता है। इसलिए, यह अत्यन्त महत्वपूर्ण हो जाता है कि अधिक से अधिक युवा नशा मुक्त भारत अभियान से जुड़ें। देश के सामने मौजूद इस चुनौती को स्वीकार करते हुए आज हम सब नशा मुक्त भारत अभियान के अंतर्गत एकजुट होकर संकल्प लेते हैं कि न केवल हमारा समाज, परिवार, मित्र बल्कि हम स्वयं भी नशामुक्त रहेंगे, क्योंकि बदलाव की शुरूआत खुद से होती है।

इसलिए, आइए हम सब मिलकर अपने जिले/राज्य.........(नाम) को नशा मुक्त बनाने का दृढ़ संकल्प करें।

मैं शपथ लेता/लेती हूं कि मैं अपने देश को नशा मुक्त बनाने के लिए भरसक प्रयास करूंगा/करूंगी।

**जय हिन्द!**

### (Pledge in English)

Dear friends,

Youth is the energy of any nation and the power of youth has an important contribution in the development of society and country. Therefore, it is very important that maximum number of youth join the drug free India campaign. Accepting this challenge of the country, today we unite under the Nasha Mukt Bharat Abhiyan and take a pledge that not only the community, family, friends, but also ourselves will be drug free because change should start with ourselves.

So let us all together take a firm decision to make our district/state.....(name) drug-free.

I pledge that I will do everything possible to the best of my ability to make my country drug-free.

**Jai Hind!**









या प्रसंगी महाविद्यालयातील विविध विभाग प्रमुख आणि प्राध्यापक वर्ग देखील उपस्थित होते. त्यामध्ये डॉ. श्यामकुमार काळपांडे, डॉ. विठ्ठल गोंड, डॉ. शामराव गुमास्ते, डॉ. प्रशांत यावलकर, डॉ. पवन घुमरे, डॉ. दीपक कदम, डॉ. पुंडलिक जाधव, डॉ. विनोद खैरनार आणि डॉ. नमिता काळे यांचा सक्रिय सहभाग होता.

| | | |
|---|---|---|
| **डॉ. संभाजी पाटील** | **प्रा. योगेश पाटणी** | **डॉ. विजयकुमार वाणी** |
| ग्रंथपाल | राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी | प्राचार्य |

NASHA MUKT BHARAT ABHIYAAN

Call 14446 today and get help with Drug De-addiction

सत्यमेव जयते

Department of Social Justice & Empowerment
Ministry of Social Justice & Empowerment
**Government of India**

# Certificate of Pledge

## "Nasha Mukt Bharat, Khushaal Bharat"

Say 'No To Drugs'

**This is to certify that**

# Dr Sambhaji G Patil

has taken a **"Say no to drugs"** pledge and committed himself/herself to consciously stay away from drug abuse and stay sober for a healthy lifestyle.

| BHNM2701747196 | 17th-Nov-2025 | Latha Ganapathy |
|---|---|---|
| Certificate Number | Date | Joint Secretary<br>Department of Social Justice & Empowerment |

# १८ नोव्हेंबर २०२५ – "नशा मुक्त भारत" अभियान (NMBA)

**आयोजक: राष्ट्रीय सेवा योजना (NSS) युनिट आणि मध्यवर्ती ग्रंथालय ग्रंथालय विभाग**







वेळ: सकाळी ११.०० वा.

ठिकाण:

एमईटी अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३

Name: Pratibha Subhash Ahire
Branch / Department: Artificial Intelligence and Data Science (Engineering)
College Name:- MET Bhujal knowledge City, Nashik.
Roll No :- 01 Div :- A
Class / Year :- Second Year.
Submission Date :- 11/10/2025
Contact No :- 7588129727

# MY DREAM OF AN ADDICTION-FREE SOCIETY

# व्यसनमुक्त समाजाचे माझे स्वप्न

आजचं जग आधुनिक तंत्रज्ञान, जलद गती आणि प्रगतीने उजळलेलं आहे, पण या तेजस्वी प्रकाशात एक काळी सावली वाढत चालली आहे - व्यसनाची. कधी दारू, सिगारेट आणि तंबाखू एवढ्यापुरतं मर्यादित असलेलं व्यसन आता मोबाईल, सोशल मीडिया, ऑनलाइन गेम्स, ड्रग्ज, आणि रील्सच्या अखंड प्रवाहापर्यंत पोहोचलं आहे.
हा एक पदार्थांचा नाही, तर विचारांचा आणि वेळेचा व्यसन बनला आहे.

आजची तरूण पिढी ही भारताची सर्वात मोठी शक्ती आहे, पण हाच तरूणवर्ग कधी कधी चुकीच्या सवयींच्या गर्तेत हरवतो. "थोडं रिलॅक्स व्हायला घेतो", "एकदाच प्रयत्न करतो" असं म्हणत व्यसनाची सुरूवात होते, आणि ती हळूहळू सवय, मग गरज आणि शेवटी जीवनाचा शत्रू बनते. व्यसन माणसाचं केवळ शरीराच नाही, तर मन, आत्मविश्वास आणि नातीही नष्ट करतं. अनेक तरूण स्वतःची ओळख, स्वप्नं आणि भविष्य गमावतात - एका क्षणिक आनंदासाठी.

पण मला विश्वास आहे - बदल शक्य आहे. माझं स्वप्न आहे असा समाज, जिथे प्रत्येक घरात संयमाचा सुगंध, प्रत्येक शाळेत जागरूकतेचा धडा आणि प्रत्येक तरूणात आत्मविश्वासाची ठिणगी असेल.
व्यसनमुक्त समाज म्हणजे फक्त नशा सोडलेला समाज नाही, तर मानसिकदृष्ट्या मजबूत, भावनिकदृष्ट्या स्थिर आणि सकारात्मक विचार करणारा समाज.

माझ्या कल्पनेत, प्रत्येक शाळा आणि कॉलेजमध्ये "Mind Care club" असावा, जिथे विद्यार्थ्यांना ताणतणाव, नैराश्य

आणि स्पर्धेचा दबाव हाताळायला शिकवले जाईल. सरकार आणि समाजसंस्था मिळून गावोगाव व्यसनमुक्ती मोहिमा राबवतील, तरुण कलाकार या विषयावर शॉर्ट फिल्म्स, नाटके आणि गाणी तयार करतील. सोशल मीडियावर '#Live-Natural' किंवा '#NoAddictionGeneration' सारखे ट्रेंड सुरू होतील.

पण सर्वांत महत्त्वाचं म्हणजे – हा बदल आपल्यापासूनच सुरू झाला पाहिजे.
जेव्हा प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या सवयींवर नियंत्रण ठेवेल, तेव्हा तो समाजालाही प्रेरणा देईल. पालक आपल्या मुलांसाठी उदाहरण बनतील, आणि मित्र एकमेकांना व्यसनापासून दूर ठेवतील.

मला असं भारत हवंय, जिथे प्रत्येक तरुणाचा हात मोबाईल-वर नव्हे, तर पुस्तकावर आणि श्रमावर असेल; जिथे आनंद नशे-मध्ये नव्हे, तर साधेपणात आणि नात्यांमध्ये असेल.
व्यसनमुक्त समाज म्हणजे फक्त दारू-विरहित राष्ट्र नव्हे, तर विचारशक्तीने संपन्न, आरोग्याने समृद्ध आणि मनाने प्रबुद्ध भारत.

आज जर आपण ठामपणे म्हटलं- "मी व्यसनाला नाही म्हणेन, आणि इतरांनाही नाही म्हणायला प्रेरणा देईन", तर उद्या नक्कीच एक नवा उषःकाल उगवेल –

जिथे प्रत्येक चेहरा नशेच्या धुरात नव्हे, तर
आत्मविश्वासाच्या तेजात चमकेल.

तेव्हाच माझं स्वप्न साकार होईल –
एक व्यसनमुक्त, सजग आणि आनंदी भारत!